# द युनिक फाउंडेशन

## प्रकाशन

सर्व वैचारिक, सामाजिक प्रश्नांवरील
पुस्तके आणि संशोधन प्रकल्प अहवाल

# ग्रंथसूची

## २०२३

THE UNIQUE FOUNDATION
*Social Intervention Through Education*




## 'द युनिक फाउंडेशन'ची भूमिका

शक्षण, प्रशिक्षण आणि विशेषत: संशोधनाद्वारे सामाजिक-सांस्कृतिक-राजकीय क्षेत्रात सकारात्मक हस्तक्षेप घडवून आणणे हे उद्दिष्ट ठेवून सार्वजनिक क्षेत्रात उतरलेल्या 'द युनिक फाउंडेशन'ने विविध कळीच्या प्रश्नांवरील संशोधन प्रकल्प, आशयघन पुस्तक प्रकाशन, चर्चा, परिसंवाद व व्याख्यानमाला यांसारखे उपक्रम राबवले आहेत. प्रचलित ज्ञानसंकल्पना-गृहीतकांना प्रश्नांकित करून चिकित्सक वैचारिक दृष्टिकोन विकसित करण्यावर फाउंडेशनच्या कामाचा भर आहे. महाराष्ट्र हे अभ्यासक्षेत्र निश्चित करून जनसामान्यांच्या जगण्याशी निगडित असणाऱ्या समस्या व धोरणांचा चिकित्सक दृष्टिकोनातून अभ्यास करणे, त्यांचे निष्कर्ष अहवाल स्वरूपात प्रकाशित करणे, हा फाउंडेशनच्या कामाचा गाभा राहिला आहे.

**वर उल्लेखित उद्दिष्टानुसार,**

१. केंद्र व राज्य सरकारच्या लोककल्याणकारी योजनांच्या रचना व अंमलबजावणीची चिकित्सा करून उपाय, शिफारशी सुचविणे व त्यावर सार्वजनिक विश्वात चर्चा घडवून आणणे यावर फाउंडेशनने भर दिला आहे. याअंतर्गत जलयुक्त शिवार अभियान योजना, पंतप्रधान पीक विमा योजना व शिक्षण हक्क कायदा या योजनांच्या अंमलबजावणीचे




चिकित्सक अभ्यास प्रकल्प पूर्ण केले आहेत.

२. ग्रामीण महाराष्ट्रातील कळीचे प्रश्न समोर आणण्याच्यादृष्टीने शेतीप्रश्न, पाणी, दुष्काळ यासंदर्भात संशोधनात्मक काम केले आणि आणखी सुरू आहे.

३. श्रमिकांचे, दुर्बल घटकांचे प्रश्न समोर आणण्यास संस्थेने प्राधान्य दिले आहे. ऊसतोडणी मजूर, टाळेबंदीच्या काळातील कामगारांचे उलटे स्थलांतर, टाळेबंदीत ग्रामीण महाराष्ट्रासमोरील पेचप्रसंग इत्यादीसंदर्भात संशोधन केले असून या प्रश्नांचा पाठपुरावा सुरू आहे.

४. निवडणुकांचा अभ्यास आणि विश्लेषण, तसेच राजकीय अभिजनांची माहिती संकलित करण्याचे काम संस्था करत आहे.

५. महाराष्ट्रातील १९९० नंतरच्या बदलत्या अर्थ-राजकारणाचा अभ्यास संस्था करत आहे.


६. मार्क्स विचारांचा चिकित्सक परिचय करून देणारा दीर्घ अभ्यास प्रकल्प संस्था राबवित आहे.

७. याखेरीज कळीचे सामाजिक, आर्थिक व राजकीय मुद्दे तसेच विचार व विचारसरणी यांबाबत अभ्यासकांची पुस्तके मराठी व इंग्रजी माध्यमातून प्रकाशित करण्याचे कार्यदेखील संस्था करत आहे.

**मुक्ता कुलकर्णी । विवेक घोटाळे**

# धोरण चिकित्सा प्रकल्प मालिका

‘द युनिक फाउंडेशन’ने ‘धोरणचिकित्सा’ हा प्रकल्प हाती घेतला आहे. याद्वारे महाराष्ट्र राज्य हे अभ्यासक्षेत्र मानून केंद्र व राज्य सरकारच्या धोरणांची व योजनांची चिकित्सा करण्याचे योजिले आहे. हे करताना केवळ धोरणांनी/योजनांनी निर्धारित केलेली उद्दिष्टे पूर्ण केली अथवा नाही इतकेच न तपासता मुळात विशिष्ट प्रकारच्या योजना का आखल्या गेल्या, त्यांच्या अंमलबजावणीतील कळीच्या यंत्रणांची व व्यक्तींची काय भूमिका राहिली, (राजकीय नेतृत्व, प्रशासकीय यंत्रणा, स्वयंसेवी संस्था, प्रत्यक्ष क्षेत्रावरील लोकांचा सहभाग, त्यातील प्रभावी हितसंबंधांचे ताणेबाणे इ.) यांचेदेखील विश्लेषण करण्याचा प्रयत्न केला आहे. धोरणनिश्चिती आणि अंमलबजावणीच्या प्रक्रियेत अंगभूत असलेले राजकारण समजून घेणे आणि त्यावर सार्वजनिक विश्वात चर्चा घडवून आणणे हे धोरणचिकित्सा प्रकल्प मालिकेचे एक दीर्घ पल्ल्याचे उद्दिष्ट आहे. याच प्रक्रियेचा एक भाग म्हणून विशिष्ट धोरण/योजना याविषयी धोरणकर्ते, अंमलबजावणी यंत्रणा, योजनेचा लाभार्थी समूह आणि अभ्यासक या सर्वांमध्ये ‘धोरण संवाद’ (Policy Dialogue) घडवून आणणे हा देखील संस्थेचा मानस आहे. शासनाने धोरणांच्या स्वायत्त मूल्यमापनाबाबत अधिक खुली व संवादी भूमिका घ्यावी, या अपेक्षेने धोरण/योजनांच्या आखणी व अंमलबजावणीचे मूल्यमापन करून त्या अधिक प्रभावी बनविण्यासाठी शासनाला शिफारशी सुचविणे, हे या मालिकेमागील आणखी एक उद्दिष्ट आहे.





## १. पंतप्रधान पीक विमा योजना महाराष्ट्र : एक मूल्यमापन


लेखक : मुक्ता कुलकर्णी । केदार देशमुख
पृष्ठसंख्या : १८४ । किंमत : २७५ रु.

शेती क्षेत्रात अरिष्टे निर्माण झाल्याच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान पीक विमा योजना ही शेतकऱ्यांसाठी आशादायी ठरावी हा योजनेचा प्रमुख उद्देश आहे. या लोककल्याणकारी योजनेचा चिकित्सक दृष्टीकोनातून अभ्यास करून ती अधिक प्रभावी ठरण्यासाठी प्रस्तुत अहवालाच्या माध्यमातून शिफारशी सुचविल्या आहेत. 'द युनिक फाउंडेशन' सन २०१८ पासून पंतप्रधान पीक विमा योजनेवर अभ्यास करीत आहे. विशेषत: या योजनेची महाराष्ट्रातील कामगिरी तपासतांना महाराष्ट्रातील मराठवाडा, विदर्भ, उत्तर महाराष्ट्र, कोकण आणि पश्चिम महाराष्ट्रातील १७ गावांचा प्रत्यक्ष पाहणीच्या द्वारे अभ्यास केला. प्रस्तुत अहवालात बीड जिल्ह्याचा विशेष अभ्यास करण्यात आला आहे. प्रस्तुत अहवालाच्या माध्यमातून काही ठळक निष्कर्ष मांडली आहेत. तसेच राज्यात पीक विमा योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी करण्यात आलेली राजकीय आंदोलने, शेतकऱ्यांच्या विविध संघटनांची आंदोलने, विविध मागण्या यांचा संदर्भ या अहवालात घेण्यात आला आहे. प्रस्तुत अभ्यासाचा एक भाग म्हणून पंतप्रधान पीक विमा योजनेवरील 'धोरण संवाद' ही एक दिवसीय कार्यशाळा आयोजित केली होती. यात शेतकरी, विविध राजकीय पक्षांचे प्रतिनिधी, पत्रकार, अभ्यासक यांनी सहभाग नोंदविला होता. या कार्यशाळेचा वृतांताची नोंद यात करण्यात आली आहे.

## 2. Pradhanmantri Fasal Bima Yojana Maharashtra : An Evaluation

Author : Mukta Kulkarni I Kedar Deshmukh I Genjumon Prasannan
Pages : 216 I Price : 300 Rs.






## ३. जलयुक्त शिवार अभियान योजनेचे मूल्यमापन

लेखक : डॉ. विवेक घोटाळे । डॉ. सोमिनाथ घोळवे

जलयुक्त शिवार अभियान ही पाणीटंचाईवर मात करण्याच्या उद्देशातून पुढे आलेली महत्त्वपूर्ण योजना आहे. या लोककल्याणकारी योजनेचा चिकित्सक दृष्टिकोनातून अभ्यास करून, प्रस्तुत अहवालातून योजनेच्या रचनेतील व अंमलबजावणीतील त्रुटी दर्शवून ती अधिक प्रभावी करण्यासाठी शिफारशी सुचविल्या आहेत. योजनेचे लाभार्थी आणि एकूणच सार्वजनिक चर्चाविश्वात या अभ्यासातून विचारमंथन होणे अपेक्षित आहे.


पृष्ठसंख्या : १८५ । किंमत : २५० रु.

## ४. शिक्षण हक्क आणि सामाजिक न्याय

लेखक : विनया मालती हरी । अश्विनी घोटाळे । योगिता काळे । पियुषा जोशी

खासगी शिक्षण संस्थांतील अवास्तव फीस व डोनेशनच्या मागणीमुळे सर्वसामान्यांना शिक्षण परवडेनासे झाले आहे. अशा काळात वंचित-दुर्बल-गरिबांसाठी शिक्षण हक्क कायद्याअंतर्गत (RTE) शाळा प्रवेशाचा मार्ग पुढे आला आहे. या लोककल्याणकारी योजनेचा चिकित्सक दृष्टिकोनातून अभ्यास करून, प्रस्तुत अहवालातून योजनेच्या रचनेतील व अंमलबजावणीतील त्रुटी दर्शवून ती अधिक प्रभावी करण्यासाठी शिफारशी सुचविल्या आहेत. योजनेचे लाभार्थी आणि एकूणच सार्वजनिक चर्चाविश्वात या अभ्यासातून विचारमंथन होणे अपेक्षित आहे.

पृष्ठसंख्या : १४१ । किंमत : २०० रु.




THE UNIQUE FOUNDATION

*Social Intervention Through Education*

# ग्रंथसूची
## २०२३

द युनिक फाउंडेशनची सर्व वैचारिक, सामाजिक प्रश्नांवरील पुस्तके




## १. व्यथा : भूसंपादन, पुनर्वसन, ऊस आणि भूजलाची

लेखक : डॉ. दि. मा. मोरे

प्रशासनातील तीस वर्षांच्या कारकिर्दीत दि. मा. मोरे यांना आलेले अनुभव विशेषत: भूसंपादन, पुनर्वसन, भूजल आणि कृषी या क्षेत्रातील कळीचे प्रश्न आणि शासन व्यवहार यांवर त्यांनी चिकित्सकपणे भाष्य प्रस्तुत पुस्तकाच्या माध्यमातून केले आहे. भूसंपादन व पुनर्वसन कायद्यातून शेतकऱ्यांचा जगण्याचा हक्क अबाधित राहिला पाहिजे अशी त्यांची सातत्याने भूमिका राहिली आहे. विकास प्रकल्पात शेत जमीन गेल्यानंतर शेतकऱ्यांची होणारी होरपळ त्यांनी खुद्द अनुभवली आहे. त्यामुळेच त्यांनी महाराष्ट्राच्या अर्थ-राजकारणात कळीच्या ठरणाऱ्या विषयांची 'व्यथा' प्रस्तुत पुस्तकाच्या माध्यमातून मांडली आहे.


पृष्ठसंख्या : २३२ । किंमत : २५० रु.


## २. महाराष्ट्रातील कालवा सिंचन

लेखक : प्रदीप पुरंदरे

कालवा ही एक विचित्र कंटूर-लाइन आहे कारण तिच्या खालच्या टोकाला परत कोरडवाहू-दारिद्रय आहे आणि वरच्या टोकाला सिंचित-श्रीमंती! पाण्यावरून जो ऐतिहासिक संघर्ष नजीकच्या भविष्यात होऊ घातला आहे. त्याची पेरणी लाभक्षेत्रात सुरू झाली आहे. पाणी-उपलब्धतेच्या आकडेवारीची विश्वासार्हता, उसाचे राज्यातील व लाभक्षेत्रातील क्षेत्र, आठमाही सिंचन धोरणाची पायमल्ली, सिंचन घोटाळा व त्याची शाश्वतता, 'जलयुक्त' व शेततळी यांचा जलविज्ञानावरील परिणाम, जल नीती २००३ आणि जल व्यवस्थापन, कारभार व नियमनाकडे होत असलेले गुन्हेगारी स्वरूपाचे दुर्लक्ष या मुद्द्यांकडे पुस्तकात लक्ष वेधले आहे.

पृष्ठसंख्या : ८४ । किंमत : १८० रु.






## ३. सत्ता, समाज आणि संस्कृती

लेखक : डॉ. जनार्दन वाघमारे

गुलामी, स्वातंत्र्य आणि लोकशाही या विषयांचे विवेचन, विश्लेषण आणि चिंतन मी 'सत्ता, समाज आणि संस्कृती' या पुस्तकात मांडले आहे. केवळ शासनच नव्हे तर समाज आणि संस्कृतीही लोकशाही मूल्यांवर आधारलेली असली पाहिजे. लोकशाही ही समाजजीवनाच्या सर्वच अंगांना स्पर्श करणारी असली पाहिजे. कारण ती केवळ व्यक्ती स्वातंत्र्याचीच हमी देत नाही तर सामाजिक न्यायाचेही अभिवचन देते. लोकशाही शासन, समाज व संस्कृती सर्वसमावेशी असणे आवश्यक आहे. सहअस्तित्वासाठी शासन, समाज आणि संस्कृती उदारमतवादावर अधिष्ठित असणे आवश्यक आहे.


पृष्ठसंख्या : २८६ । किंमत : ३०० रु.


## ४. कांद्याची रडकथा : शिवार ते बाजार

लेखक : योगेश प्रकाश बिडवई

कांदा हे एकच पीक घेऊन त्यावर सर्व बाजूंनी व्यापक संशोधन करण्याचा प्रयत्न म्हणून वरिष्ठ पत्रकार योगेश बिडवई यांच्या प्रस्तुत अभ्यासाकडे पाहता येईल. कांदा उत्पादनात अग्रेसर असलेल्या महाराष्ट्रात व आशिया खंडातील प्रमुख बाजारपेठ असलेल्या नाशिक जिल्ह्यातील लासलगाव बाजारपेठेत सतत अनिश्चितता का निर्माण होते, कांदा उत्पादक शेतकऱ्यांचे प्रश्न, साठवणुकीतील अडचणी, साठेबाजी आणि व्यापाऱ्यांची मक्तेदारी, महिलांचे श्रम, भावातील चढउतार, हवामान बदल, शासनाची भूमिका, शिवार ते बाजारापर्यंतच्या अर्थकारणाची चर्चा लेखक करतात.

पृष्ठसंख्या : २०० । किंमत : २५० रु.






## ५. जातवार जनगणना कशासाठी ?

लेखक : दिलीप चव्हाण

जातवार जनगणना हा एक समकालीन सामाजिक-राजकीय चर्चाविश्वातील कळीचा मुद्दा बनला आहे. जातवार जनगणना होऊ न देण्यामागील सत्ताधारी वर्ग आणि प्रबळ जातींतील अभिजन वर्गाचे हितसंबंध स्पष्ट करतानाच डाव्या चळवळीच्या भूमिकेत बदल होणे आणि दलित चळवळीत मौन का हे मुद्देदेखील ते मांडतात. शेवटी, भारतीय समाजाचे जात मागासलेपणा नष्ट करण्यासाठी या मागासलेपणाचे मापन आवश्यक असल्याचे लेखक प्रतिपादन करतात. समकालीन विषयाची चर्चा करणारी ही पुस्तिका प्रासंगिक वाटत असली, तरी भारतातील एका जटील प्रश्नावर ती महत्त्वपूर्ण भाष्य करते.


पृष्ठसंख्या : ५० । किंमत : ५० रु.


## ६. कोरोना आपत्ती : लॉकडाऊन आणि लोकशाहीचे अपहरण

संपादन : मुक्ता कुलकर्णी । विवेक घोटाळे । भारत पाटील

कोरोना महामारी आणि ती आटोक्यात आणण्यासाठी लावण्यात आलेल्या टाळेबंदीचा परिणाम वैयक्तिक आयुष्याबरोबरच देश-राज्याच्या अर्थकारणावर, शिक्षण व रोजगारावरही झाला. या कालखंडातील विविध पैलूंवर मान्यवर अभ्यासकांनी दिलेल्या व्याख्यानाचे संस्थेने शब्दांकन केले. व्याख्यानमालेशिवाय आणखी काही अभ्यासकांचे लेख मागविण्यात आले. शिवाय संस्थेने इकॉनॉमिक अँड पॉलिटिकल विकली (EPW) या प्रतिष्ठित नियतकालिकांतील संपादकीय लेखांचे मराठी भाषेत रूपांतर केले होते. त्यातील टाळेबंदीसंदर्भातील काही लेखांचाही या पुस्तकात समावेश केला आहे.

पृष्ठसंख्या : २५६ । किंमत : २५० रु.






## ७. कोरोना काळातील जागतिक अर्थव्यवस्था

लेखक : संजीव चांदोरकर

संजीव चांदोरकर यांनी दै. लोकसत्तामधून 'अर्थाच्या दशदिशा' नावाने पाक्षिक सदरही (२०२०) चालविले. त्यातील लोकसत्तामध्ये प्रकाशित लेखांचे एकत्रित संग्रह या पुस्तक रूपाने प्रकाशित झाले. प्रस्तुत पुस्तकात जागतिक अर्थव्यवस्थेसमोर कोरोनामुळे निर्माण झालेली संकटे, त्यांच्या सद्य व दीर्घकालीन परिणामाची चर्चा केली आहे. संकटात सापडलेल्या जागतिक अर्थव्यवस्थेसोबतच भारतीय अर्थव्यवस्थेसमोरील आव्हाने समजून घेण्यास हे पुस्तक सहाय्यभूत ठरते. या सर्व अरिष्टात नवउदारमतवादाचा पोकळपणा कसा उघडा पडला, ह्या महत्त्वपूर्ण मुद्यांची चर्चा लेखक शेवटी करतात.


पृष्ठसंख्या : १२४ । किंमत : १०० रु.


## ८. लॉकडाऊन काळातील ग्रामीण महाराष्ट्र

लेखक : सोमिनाथ घोळवे

कोरोना संसर्गाची साथ थोपविण्याचा एक उपाय म्हणून लॉकडाऊनचा निर्णय कोरोनाच्या पहिल्या व दुसऱ्या लाटेतही घेण्यात आला. परंतु या निर्णयाचे दूरगामी परिणाम समाजातील सर्वच घटकांवर होत आहेत. ग्रामीण भागातील शेतकरी, शेतीशी संबंधित घटकांवर, मागास-कनिष्ठ-भटके-विमुक्त-गरीब मुस्लीम इत्यादी समाज घटकांवर लॉकडाऊनचे विपरीत परिणाम झाले. या सर्वांचा आढावा डॉ. सोमिनाथ घोळवे यांनी विविध लेखांतून घेतला आहे. केवळ आढावा घेऊन न थांबता वंचित समाज घटकांच्या जगण्याचे दुःख कारणमीमांसेसह पुढे आणतानाच त्यासंदर्भात काही उपायदेखील सूचविण्याचा प्रयत्न केला आहे.

पृष्ठसंख्या : १२८ । किंमत : १०० रु.






## 9. Indian Modernity : Challenges and Responses

Editor : Jaswandi Wanburkar

मराठी साहित्याच्या विपूल आधार घेऊन, मराठीतील अस्सल कागदपत्रे अभ्यासून हा ग्रंथ संपादिका डॉ. जास्वंदी वांबूरकर यांनी तयार केला आहे. भारतीय पातळीवरील आधुनिकता आणि महाराष्ट्र पातळीवरील आधुनिकतेचा आजतागायतचा प्रवाह ही या ग्रंथाची मुख्य कल्पना आहे. डॉ. जास्वंदी वांबूरकर यांनी अनेक गौरवग्रंथांचा अभ्यास करून हा गौरवग्रंथ सिद्ध केल्याचे आपणास समजते. ज्यांच्यावर हा गौरवग्रंथ आधारित आहे, त्या डॉ. राजा दीक्षित यांचा जीवनाचा समग्र आढावा त्यांनी घेतला आहे. तो अत्यंत अभ्यासपूर्ण आहे. गौरवग्रंथ कसा सिद्ध करावा याचा तो उत्तम नमुना आहे.


पृष्ठसंख्या : ३५० । किंमत : ३५० रु.


## १०. नवउदार जगाचा उदयास्त

लेखक : दत्ता देसाई

प्रबोधन युगानंतर १९ व्या ते २१ व्या शतकाला विविध विचारप्रणालींनी व्यापले. उदारमतवाद-समाजवादाचा उदय, विस्तार आणि पडझडीनंतर नवफासीवादाचे अरिष्टे पुढे आलेली दिसतात. उदारमतवाद, राष्ट्रवाद, फासीवाद, समाजवाद, आंतरराष्ट्रीयवाद, नवउदारमतवाद आणि जागतिकीकरण या सात विचारसरणीचा सविस्तर आढावा साथी दत्ता देसाई यांनी घेतला आहे. समकालीन अर्थ-राजकीय परिस्थितीत विचारप्रणालींची चिकित्सा करणारा हा ग्रंथ प्रासंगिक ठरतो. हे पुस्तक विविध मुद्द्यांविषयी मूलगामी चर्चा करते. विविध कल्पनाप्रणालींची व व्यवस्थांची परखड समीक्षा करते. आजच्या प्रश्नांचा मुळापासून वेध घेते; आणि शोधही घेते- जगाच्या नव्या दिशेचा, मानवी स्वप्ने वास्तवात आणण्याचा...

पृष्ठसंख्या : २९० । किंमत : २८० रु.






## ११. आधुनिक महाराष्ट्रातील विचारवंत

लेखक : भास्कर लक्ष्मण भोळे

प्रा. भा. ल. भोळे सरांनी वैचारिक लिखाणाबरोबरच आग्रहाने मराठीतून पाठ्यपुस्तके लिखाणाचे विपूल कार्य केले. 'लोकशाही समाजवाद' हे त्यांच्या विचारांचे गाभासूत्र होय. म. फुले, डॉ. आंबेडकर, छ. शाहू, म. शिंदे, आगरकर ही विचारपरंपरा स्वातंत्र्योत्तर भारताच्या जडणघडणीसाठी अधिक उपयुक्त ठरेल असा त्यांचा विश्वास होता. एकोणिसाव्या शतकातील व विसाव्या शतकाच्या पूर्वार्धातील आठ विचारवंतांच्या विचारांची/कार्याची चिकित्सा डॉ. भोळे यांनी विविध लेख व पुस्तिकेद्वारे केली होती. हे सारे लेखन या पुस्तकात संग्रहित केले आहे.


पृष्ठसंख्या : २२४ । किंमत : २५० रु.


## १२. समतामूलक शाश्वत विकासाची दिशादृष्टी

लेखक : प्रा. एच. एम. देसरडा

प्रस्तुत पुस्तकात शेती, पाणी, दुष्काळ आणि पर्यावरण या क्षेत्रांतील समस्या मांडताना त्याच्या कारणांची आणि परिणामांची ते चिकित्सा करतात. शेतीक्षेत्रातील अरिष्टाला औद्योगिक व्यवस्था, रासायनिक शेती आणि अभिजनधार्जिणी अर्थधोरणे जबाबदार असल्याचे देसरडा सांगतात. ते केवळ समस्या मांडून थांबत नाहीत तर अरिष्टावर मात करण्यासाठी आणि समता व न्याय प्रस्थापित करण्यासाठी त्यांचा भर शाश्वत विकासावर आहे. आणि त्यासाठी देसरडा आपल्याला 'नव्या पारिस्थितिकी संस्कृतीचा' (इकॉलॉजिकल सिव्हिलायझेशन) स्वीकार करण्याचे सुचवितात.

पृष्ठसंख्या : २५४ । किंमत : २३० रु.






## १३. आपलं आयकार्ड

लेखक : राही श्रुती गणेश । श्रीरंजन आवटे

भारतीय संविधानाच्या उद्देशपत्रिकेतील स्वातंत्र्य, समानता, न्याय, बंधुता, लोकशाही, समाजवाद व धर्मनिरपेक्षता ही तत्वे म्हणजे संविधानाची मूल्यं चौकट. या आदर्श मूल्यांचा व्यवहार काय आहे हे दैनंदिन जीवनातील, समाजात घडणाऱ्या वास्तव घटनांची उदाहरणे देऊन संविधानातील मूल्य संकटात सापडल्याचे स्पष्ट करतात, आणि ती रूजविण्यासाठी काही उपायही सांगतात. भारतात तरूणांची संख्या मोठी आहे. विशेषतः १८ वर्ष पूर्ण झालेले आणि पहिल्यांदा मतदानाचा हक्क बजावणाऱ्या तरूणांची लक्षणीय संख्या आहे. हे नव मतदार व एकुणच सर्व तरूणांना समोर ठेऊन आणि त्यांनाच संविधान रूपी आयकार्ड हाती देण्यासाठी या पुस्तकाची मांडणी करण्यात आली.


पृष्ठसंख्या : १०४ । किंमत : १५० रु.


## १४. महाराष्ट्र वार्षिकी

संपादक : तुकाराम जाधव

'महाराष्ट्र वार्षिकी : २०२२' हा 'द युनिक ॲकॅडमी, पुणे' आणि 'द युनिक फाउंडेशन, पुणे' या संस्थेचा अभ्यास प्रकल्प होय. 'टीम युनिक' आणि युनिक ॲकॅडमी-युनिक फाउंडेशनशी संबंधित हितचिंतक, लेखक, अभ्यासक, प्राध्यापक, पत्रकार, संशोधक, सामाजिक कार्यकर्त्यांच्या सहकार्यातून महाराष्ट्र वार्षिकी प्रकाशित करण्यात येते.
सध्य निराशाजनक परिस्थितीतही यंदाच्या वार्षिकीच्या स्वरूपात थोडा बदल करून केवळ माहितीपर घटना - घडामोडी - समस्या मांडण्याऐवजी त्याची कारणपरंपरा आणि उपाय सुचविणाऱ्या शिवाय काही सकारात्मक प्रयोगाची चर्चा करणाऱ्या आशय संपन्न सविस्तर मांडणी करणाऱ्या लेखांचा समावेश केला आहे. प्रस्तुत वार्षिकीत ५८ लेखांची विभागणी पाच विभागांत केली आहे.

पृष्ठसंख्या : ३०२ । किंमत : ३०० रु.






## १५. पाश्चात्त्य विचारसरणींच्या इतिहासातील महत्त्वाचे टप्पे

लेखक : जयंत लेले

पाश्चात्त्य विचारप्रणालींच्या इतिहासातील महत्त्वाच्या टप्प्यांची चर्चा प्रस्तुत पुस्तकात केली आहे. पाश्चिमात्य जगातील प्रबोधन, फ्रेंच राज्यक्रांती व त्यानंतर फ्रेंच राज्यक्रांतीला वैचारिक व कृतिशील स्वरूपाच्या उमटलेल्या प्रतिक्रिया, कार्ल मार्क्सचा विचार आणि पाश्चिमात्य विचारावर मार्क्सचा कसा प्रभाव पडला आणि त्या विचारांतून कोणत्या प्रतिक्रिया पुढे आल्या याची मांडणी संवादाच्या स्वरूपात या पुस्तकात करण्यात आली आहे. पुस्तकात १. प्रबोधन, २. पुनर्जागरण, ३. फ्रेंच राज्यक्रांती, ४. समाजाचा अभ्यास वैज्ञानिक पद्धतीने कसा करायचा आणि ५. मार्क्सवादानंतर अशी पाच प्रकरणं आहेत.


पृष्ठसंख्या : १९५ । किंमत : १५० रु.

## १६. विचारसरणीच्या विश्वात

लेखक : प्रा. यशवंत सुमंत

एका बाजूला विकासाची 'उत्तुंग शिखरे' तर दुसरीकडे विस्थापनाच्या दऱ्या.एकीकडे विश्वबंधुत्वाची भाषा तर दुसरीकडे जातीय-धार्मिक-भाषिक विद्वेषाचे वणवे. भवताली असा सारा कोलाहल आणि राष्ट्र-राज्य व्यवस्थेपासून कुटुंबसंस्थेपर्यंत सर्वत्र उभी आव्हाने! यातले हताशपण अनुभवताना आपले आकलन जागे ठेवण्यासाठी मदतीला येतात त्या विचारसरणी. विविध विचारसरणींचा उगम, आविष्कार आणि वाटचाली कशा प्रकारे होतो, विविध पेचातून विचाराद्वारे कशा प्रकारे मार्ग काढता येईल, याचा आढावा व सर्व विचारसरण्या कशा परिस्थितीत पुढे आल्या व विकास पावल्या यांची मांडणी अत्यंत मार्मिक आणि नेमकेपणाने या पुस्तकात केली आहे.

पृष्ठसंख्या : १३६ । किंमत : १०० रु.






## १७. भारतीय लोकशाही, नागरी समाज, वंचित समूह

लेखक : प्रा. यशवंत सुमंत

स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्यानंतरच्या भारतीय लोकशाहीच्या चर्चाविश्वाची दखल घेऊन या चर्चाविश्वातून एकूण नागरी समाजाचे तत्व-व्यवहार तपासणं आणि समांतरपणे वंचित समूहांच्या प्रश्नांचे राजकारण कसे उभे राहील या विषयीच्या विचारप्रक्रियेचे प्रतिबिंब या पुस्तकातून पुढे आणले आहे.
भारतीय लोकशाही कोणत्या परिस्थितीतून विकसित झाली, तिची वैशिष्ट्ये, लोकशाहीकरणातील क्रियाशील सामाजिक घटक, ही संकल्पना अधिक आशयघन बनविणाऱ्या व्यक्ती व विचारसंप्रदाय, तिच्या समोरील आव्हाने, अभ्यासकांनी केलेले भारतीय लोकशाहीचे सिद्धांन्तन याची चर्चा.


पृष्ठसंख्या : १२५ । किंमत : १०० रु.


## १८. आधुनिक राजकीय सिद्धांत

प्रा. अशोक चौसाळकर

आधुनिक राजकीय सिद्धांतात अनेक बदल झालेले असून, त्यानुसार नवीन सिद्धांत पुढे येताना दिसतात. दुसऱ्या महायुद्धानंतरच्या बदलांचा परिणाम राजकीय सिद्धांतावर झाला. आधुनिकीकरण व राजकीय विकासाचा सिद्धांत, वर्तनवादी विकासवादी सिद्धांत, स्त्रीवाद, पर्यावरणवाद आणि उत्तरआधुनिकवाद या विचारप्रणालींची मांडणी वेगवेगळ्या टप्प्यांवर झाली. समग्र व्यवस्थेचा विचार मांडणाऱ्या भूमिकांपासून समूह व व्यक्तींच्या हक्कांबाबत विचार व सिद्धांताच्या पातळीवर विचार मांडले गेलेत. १९५० नंतरच्या साठ ते पासष्ठ वर्षांच्या राजकीय विचारांच्या विकासाचा आढावा प्रस्तुत पुस्तकात घेण्यात आला आहे.

पृष्ठसंख्या : १५६ । किंमत : १७५ रु.






## १९. आधुनिकतेचे आगमन

युरोपकेंद्री इतिहासाचा 'जागतिक' विचार

लेखक : दत्ता देसाई

'माणूस इतिहास घडवतो' आणि इतिहास जाणणे म्हणजे 'भविष्यकाळाकडून येणाऱ्या प्रकाशाकडे पाहणे' हे भान जगाला आधुनिकतेने दिले. या आधुनिकतेचे आगमन प्रथम ज्या युरोपात झाले त्याच्या इतिहासात आशिया-आफ्रिका आणि अमेरिका खंडांचा फार मोठा वाटा राहिला. तो काय होता? आणि तरीही, आधुनिक जगामध्ये युरोपची आाघाडी आणि जगावर त्याचे वर्चस्व प्रस्थापित झाले, ते का? भारताशी असलेला याचा संबंध आणि याला समांतर प्रक्रिया काय होत्या?
या व अशा प्रश्नाची अभ्यासपूर्ण चर्चा असलेले पुस्तक...


पृष्ठसंख्या : २८० । किंमत : ३०० रु.


## २०. कोसळलेले सोव्हिएत मॉडेल

लेखक : मायकेल लेबोविट्झ
स्वैर रूपांतर : संजीव चांदोरकर

सोव्हिएत मॉडेल कोसळल्यानंतरदेखील तशाच आदर्शावर, त्याच स्वप्नावर आधारित राजकीय जनआंदोलने, संघटना, पक्ष जगभर अजूनही काम करत आहेत. या पार्श्वभूमीवर रशियातील प्रत्यक्षात अस्तित्वात असलेली समाजवादी राज्य-समाजव्यवस्था का कोसळली आणि हे समजून घेण्याची गरज निर्माण का झाली हे मायकेल लेबोविट्झ यांनी "The Contradiction of Real Socialism" या पुस्तकात सांगण्याचा प्रयत्न केला आहे. त्यात अग्रदल, कम्युनिस्ट पक्ष, कामगार वर्ग, व्यवस्थापक वर्ग, आजारी अर्थव्यवस्थेची निरीक्षणे, प्रतिस्पर्धी विचारप्रणालीचे आव्हाने, अग्रदलीय मार्क्सवादाला रजा द्या, अशा आशयाची मांडणी आणि शेवटी चर्चेसाठी अनेक मुद्दे उपस्थित केले आहेत.

पृष्ठसंख्या : २०८ । किंमत : १०० रु.






## २१. गॅस वॉर : साट्यालोट्याची भांडवलशाही आणि अंबानी

लेखक : परंजोय गुहा ठाकुर्ता

कृष्णा-गोदावरी खोऱ्यातील वायू व अंबानी बंधूमधील भांडणं यांच्याशी संबंधित वादांची मालिका उलगडण्याचा व तिचे विश्लेषण करण्याचा प्रयत्न म्हणजेच हा ग्रंथ होय. या पुस्तकात लोकशाही व्यवस्थेतील धोरणनिर्मितीमध्ये जाणीवपूर्वक ठेवण्यात आलेल्या पायवाटांचा बेधडक गैरवापर करण्याची मोकळीक रिलायन्स कंपनीला कशी मिळते, अर्थात साट्यालोट्याच्या भांडवलशाहीच्या काही अंगाकडे लक्ष वेधण्याचा प्रयत्न या ग्रंथात केला आहे. शिवाय मोजक्या लोकांच्या लाभासाठी धोरणे आणि प्रक्रिया बदलण्याचा घाट घातला गेल्याच्या काही घटनाही अधोरेखित केल्या आहेत.


पृष्ठसंख्या : ३०४ । किंमत : ३०० रु.


## २२. वित्तीय अरिष्टे : कारणे व परिणाम

लेखक : संजीव चांदोरकर

भारतीय अर्थव्यस्था, विशेषत: वित्तीय अर्थव्यवस्थेच्या पुढील पेच आणि आव्हाने समजून घेण्यासाठी 'वित्तीय अरिष्टे : कारणे व परिणाम' हे पुस्तक महत्त्वाचे आहे. जागतिक वित्तीय क्षेत्रात कोणती वित्तीय अरिष्टे निर्माण झाली आहेत आणि त्यामुळे जगाच्या व एकूणच भारताच्या अर्थव्यवस्थेवर कोणते परिणाम होत आहेत आणि वित्तीय अरिष्टे निर्माण होण्यामागे कोणती आर्थिक पार्श्वभूमी आहे यावर भाष्य करणारे हे पुस्तक आहे. औद्योगिक भांडवलशाही ते वित्तीय भांडवलशाही या भांडवलशाहीच्या प्रवासातील पेचप्रसंग आणि गरीब जनता व त्यांच्या प्रश्नांना वित्तीय भांडवलशाही कोणत्या पद्धतीने आपल्या कवेत घेत आहे, याची मांडणी लेखकाने केली आहे.

पृष्ठसंख्या : २१३ । किंमत : १८० रु.






## २३. अर्थचित्रे

लेखक : माधव दातार

'अर्थचित्रे' या पुस्तकातून विसाव्या शतकात जागतिक पातळीपासून ते देश-राज्य स्तरापर्यंत विचार-व्यवहारातून कार्यरत असणाऱ्या निवडक अर्थशास्त्रज्ञांच्या व्यक्तिमत्त्वाचा वेध घेण्यात आला आहे. जोन रॉबिन्सन, निकोलस कॅल्डॉर, जवाहरलाल नेहरू, अमर्त्य सेन, ध. रा. गाडगीळ, चिंतामणराव देशमुख, वि. म. दांडेकर, जोसेफ स्टिगलिट्झ, पी. आर. ब्रह्मानंद, पॉल स्वीझी, मिल्टन फ्रिडमन, अशोक मित्र, के. एन. राज, रा. ह. पाटील, स. ह. देशपांडे, कांता रणदिवे इत्यादी व अन्य काही अर्थशास्त्रज्ञांचा परिचय लेखकाने करून दिला आहे. व्यक्तिमत्व आणि विचार यांच्यातील नाते कितपत जवळचे, अतुट असते याचा वेध या अर्थचित्राच्या माध्यमातून घेतला आहे.


पृष्ठसंख्या : २०६ । किंमत : १५० रु.


## २४. ऊर्जास्वातंत्र्याच्या दिशा

लेखक : प्रकाश बुरटे

मानवाने केलेली तांत्रिक प्रगती आणि त्याचा मानवी जीवनाशी असणारे संबंध व त्यातून निर्माण होणारी गुंतागुंत समजून घेतली तर ऊर्जासमस्येचा आवाका लक्षात येईल. मानवी जीवनमानाचे पैलू बदलत असल्यामुळे ऊर्जा आणि ऊर्जास्त्रोतांची गरज वाढते आहे आणि त्याचवेळी ऊर्जास्त्रोत आटत चालले आहेत. या अंतर्विरोधातून ऊर्जासमस्या अवतरली आहे. जगाच्या, भारताच्या आणि महाराष्ट्राच्या भवितव्यासाठी ऊर्जासमस्येची उकल करण्याचे प्रश्न कळीचे बनले आहेत आणि ही उकल करण्यासाठी विज्ञानाबरोबरच लोकशाही मार्गाने होणारा लोकसहभागसुद्धा महत्त्वाचा आहे. या दिशेने मांडणी करणारे 'ऊर्जास्वातंत्र्याच्या दिशा' हे पुस्तक आहे.

पृष्ठसंख्या : २०६ । किंमत : १५० रु.






## २५. दुष्काळाला भिडताना

लेखक : रमेश पाध्ये

काही मोजके जिल्हे वगळता पाण्याची कमी-जास्त प्रमाणात टंचाई महाराष्ट्रात दिसून येते. त्यात पीकपद्धतीत विसंगती असल्याने पाण्याची टंचाई तीव्र निर्माण झाल्याशिवाय राहत नाही. ऊसाची लागवड झाल्याने पाण्याची तीव्र टंचाई कशी निर्माण होते, सिंचनव्यवस्थेत असलेली अनागोंदी, चाकोरीबाहेरचा मार्ग वापरून फळबागा आणि वृक्ष लागवड कशा प्रकारे होते, शासनाची भूमिका या संदर्भात काय राहिलेली आहे, प्रशासनाने चुकीच्या पद्धतीने दुष्काळ निर्मूलनाच्या विविध योजना कशा हाताळल्या आहेत अशा अनेक प्रश्नांची मांडणी या छोट्या पुस्तकातून पुढे येते.


पृष्ठसंख्या : ९९ । किंमत : ८० रु.


## २६. शेती, शेतकरी आणि अर्थकारण

लेखक : रमेश पाध्ये

देशात शेतीक्षेत्रावर उत्पादनासाठी अवलंबून असणाऱ्या लोकसंख्येची टक्केवारी ही निम्म्यापेक्षा जास्त आहे. सहाजिकच भौतिक विकासाच्या संदर्भात शेतीक्षेत्राच्या शाश्वत विकासाचा प्रश्न महत्त्वाचा आहे. शेतकऱ्यांचे कैवारी म्हणवून घेणारी मंडळी केवळ शेतमालाचे भाव वाढवून मिळावेत यासाठी लढे उभारतात. प्रस्थापित व्यवस्थेत त्यांची मागणी काही प्रमाणात मान्यही होते. परंतु यामुळे भाववाढीचे दुष्टचक्र गतिमान होऊन प्रत्यक्षात श्रमजीवी लोकांचे जीवनमान खालवते. थोडक्यात वरवर दिसते त्यापेक्षा आर्थिक प्रक्रिया ही समजण्यासाठी खूपच अवघड असते असा एकंदर गुंता उलघडून दाखवण्याचा प्रयत्न या पुस्तकात करण्यात आलेला आहे.

पृष्ठसंख्या : २०५ । किंमत : १५० रु.






## २७. देश-प्रदेश : प्रादेशिक राजकारणाच्या बदलत्या दिशा

लेखक : सुहास पळशीकर

देशाच्या राजकीय प्रक्रियेच्या अभ्यासात प्रादेशिक राजकारण हा एक मध्यवर्ती घटक असतो आणि म्हणून प्रादेशिक पातळीवरील राजकारणाचे आकृतिबंध पाहवे आणि समजून घ्यावे लागतात. ह्या भूमिकेतून प्रस्तुत पुस्तकात काही राज्यांच्या राजकारणाचा संक्षिप्त आढावा स्वतंत्रपणे घेतला आहे. त्या-त्या राज्यातील राजकीय स्पर्धा कसकशी विकसित झाली, तिच्यातील मुख्य टप्पे कोणते आणि त्या स्पर्धेला लाभलेली चौकट नेमकी कोणत्या वैशिष्ट्यांनी बद्ध आहे, याची मांडणी केली आहे.


पृष्ठसंख्या : २५६ । किंमत : ३०० रु.


## २८. ऊसतोडणी मजुरांचं स्थलांतरित जगणं

लेखक : कॉ. कुमार शिराळकर । मुक्ता कुलकर्णी । विवेक घोटाळे । सोमिनाथ घोळावे

असंघटित क्षेत्रातील मजुरांचे प्रमाण सतत वाढत आहे. शेतीक्षेत्रातील अनेक पेचप्रसंगातून अल्पभूधारक व भूमिहीन शेतमजूर असंघटित क्षेत्रात येत आहेत. त्यातील एक मोठी संख्या ऊसतोडणीचं काम करते. ऊसतोडणी मजुरांचे सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक प्रश्न असो किंवा स्थलांतराचे प्रश्न असो किंवा जगण्याचे प्रश्न असो त्याची तीव्रता वाढत आहे. या प्रश्नांचा आढावा ‘ऊसतोडणी मजुरांचं स्थलांतरित जगणं’ या पुस्तकातून घेण्यात आला आहे. प्रस्तुत पुस्तक हे युनिक फाउंडेशनने केसस्टडी पद्धतीने केलेल्या संशोधन प्रकल्पाचा अहवाल आहे.

पृष्ठसंख्या : १०० । किंमत : १२० रु.






## २९. महाराष्ट्रातील दुष्काळ :

मराठवाड्यातील आणि पश्चिम महाराष्ट्रातील दुष्काळाचा अभ्यास

लेखक : विवेक घोटाळे । अभय कांता । सोमिनाथ घोळवे । केदार देशमुख । भारत पाटील

दुष्काळाची कारणे काय आहेत आणि त्याचे परिणाम काय होतात, याचा शोध घेत दुष्काळ निर्मूलनाच्या दृष्टीने कशी पाऊले टाकता येतील या भूमिकेतून मराठवाड्यातील तीन आणि पश्चिम महाराष्ट्रातील तीन अशा सहा गावांचा केसस्टडी करण्यात आला आहे. प्रत्यक्ष दुष्काळग्रस्त कुटुंबाचे सर्वेक्षण आणि गावातील राजकीय नेतृत्व, गावकरी, पंच, सरपंच, प्रशासकीय अधिकारी-कर्मचारी आणि महिला यांच्या मुलाखतीच्या आधारे बहुआयामी तथ्यांची मांडणी आणि विश्लेषण या पुस्तकात केले आहे.


पृष्ठसंख्या : १२० । किंमत : १०० रु.


## ३०. उदारीकरणानंतरचा महाराष्ट्र : समकालीन कळीचे मुद्दे

लेखक : चंपत बोड्डेवार । विवेक घोटाळे महेश शिरापूरकर । श्रीकांत कांबळे

उदारीकरणाचे धोरण स्वीकारून २५ वर्षे उलटून गेली. यादरम्यानच्या कालखंडात या धोरणाचा एक परिणाम शेती क्षेत्रावर पडून शेतीतील शासकीय गुंतवणूक कमी होऊन शेतीक्षेत्रातील अरिष्ट वाढले. त्याची परिणती शेतकरी आत्महत्या ते शेतकरी संपावर जाण्यापर्यंत झाली. प्रस्तुत पुस्तकात शेतीसमस्या, दुष्काळाचे सातत्यचक्र आणि पाणीसंकटाचा मान्यवर अभ्यासकांनी मागोवा घेतला आहे. हे प्रश्न मांडतानाच लोकसहभागातून साकारलेले जलसंधारणाचे काही प्रयोगही समोर मांडले आहेत. पाणी फाउंडेशनच्या प्रयत्नास लोकांचा उत्स्फूर्त पाठिंबा कसा मिळत आहे, जलयुक्त शिवार योजनेची अंमलबजावणी याचा मागोवा घेतला आहे.

पृष्ठसंख्या : २१५ । किंमत : २३० रु.






## ३१. शेतीक्षेत्रातील पेचप्रसंग अन् त्याचे राजकारण

लेखक : विवेक घोटाळे

शेतीक्षेत्रातील विविध समस्यांतून शेतकरी बांधवात एक प्रकारची अस्वस्थता वाढली आहे. या अस्वस्थतेने शेतकरी आत्महत्येचे एक टोक गाठले, तर दुसऱ्या बाजूला ही अस्वस्थता संघटित होऊन शेतकरी संपापर्यंत पोहचली. शेती समस्या नेमक्या कोणत्या आहेत आणि त्यातून त्यांना कोणत्या परिणामांना सामोरं जावं लागतं याची चर्चा ही पुस्तिका करते. शेतीचे तुकडीकरण, कर्जबाजारीपणा, शेतकरी आत्महत्या, हमीभावाचा प्रश्न, वाढते बिगरकृषी क्षेत्र, जागतिकीकरणाचा शेतीक्षेत्रावरील परिणाम, शासनाचे कृषीधोरण इत्यादीचा आणि शेती प्रश्नांवर काही उपाय याचा आढावा यात आहे.

पृष्ठसंख्या : ७० । किंमत : ७० रु.


## ३२. महाराष्ट्राचे राजकारण नव्या वळणावर


विधानसभा निवडणुक २०१४ :
सामाजिक, आर्थिक व राजकीय अन्वयार्थ

लेखक : तुकाराम जाधव । विवेक घोटाळे । विजय कुंजीर । अभय कांता । महेश शिरापूरकर

२०१४ च्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत मोदीलाट किंवा विकासाचा मुद्दा माध्यमातून पुढे करण्यात आलेला असला तरी स्थानिक पातळीवर 'जात' हा घटक अधिक सक्रिय दिसून आला. त्यामुळेच पक्षांचा बदलता सामाजिक आधार, मराठा, दलित-आदिवासी, ओबीसींची भूमिका, याचबरोबर शहरी मतदारांचा कल, महायुतीतील स्वाभिमानी, रिपाइं (आ.) व रासपची भूमिका, माध्यमांची पक्षपाती भूमिका, महिला प्रतिनिधित्वाचा प्रश्न इ. घटकांची विस्तृत चर्चा या ग्रंथामध्ये केली आहे.

पृष्ठसंख्या : ३८८ । किंमत : ३५० रु.






## ३३. तरुण व होतकरू कार्यकर्त्यांसाठी टिपणवही

(भाग १)

लेखक : संजीव चांदोरकर

''तरुण व होतकरू कार्यकर्त्यांसाठी टिपणवही - भाग १'' या पुस्तिकेत सम ाजवादी अर्थरचना, आजच्या तरुण पिढीचे वेगळेपण, तरुणांमधील आंतरजातीय विवाह, इंग्रजी भाषा व कार्यकर्त्यांचा बुद्धिभेद, भांडवली व्यवस्थेने घातलेला वैचारिक गोंधळ, राहणीमानाविषयीचे प्रश्न, भौतिक सुख आणि आत्मिक आनंदाच्या बदलत्या संकल्पना, डाव्या चळवळीचे आत्मपरीक्षण, नवीन व्यवस्थापन आणि भांडवली शिक्षणव्यवस्था व वंचित /बहुजन घटकांतून आलेले परिवर्तन अशा अनेक प्रश्नांचा समिक्षात्मक आढावा घेतला आहे.

पृष्ठसंख्या : १४४ । किंमत : ५० रु.


## ३४. जुन्या-जाणत्या कार्यकर्त्यांसाठी टिपणवही


(भाग २)

लेखक : संजीव चांदोरकर

''जुन्या जाणत्या कार्यकर्त्यांसाठी टिपणवही - भाग २'' या पुस्तिकेत विचारसरणी, विचारप्रक्रियेचा पाया व्यापक करण्याची गरज, परिवर्तनवादी चळवळीतील सामान्य कार्यकर्त्यांपुढील आव्हाने, कार्यकर्त्यांमधील कलागुण, त्यांचे राहणीमान, त्यांचे अकाली मृत्यू, अल्पसंख्यत्वाची मानसिकता, संघटनात्मक बाबीकडे दुर्लक्ष, त्यांच्यातील फूट आणि एकजूट, कॉम्रेडशिप, डाव्या चळवळीतील सम्यक संवाद, परिवर्तनवादी मासिकांचे अर्थकरण - व्यवस्थापनाच्या गोच्या? अशा अनेक प्रश्नांचा आढावा घेण्यात आला आहे. व्यवस्था परिवर्तनात पूर्णवेळ वाहून घेतलेल्या कार्यकर्त्यांचे जीवनअनुभव समजून घेण्यास हे दोन भाग उपयुक्त ठरतात.

पृष्ठसंख्या : १७६ । किंमत : ६० रु.






## ३५. महाराष्ट्रातील जमीनविषयक प्रश्नांची झाडाझडती

लेखक : सतिश मुकुंद जोशी

देशभर आणि महाराष्ट्रात जमीनविषयक प्रश्न गंभीर होत असताना तरुण पिढीतील कार्यकर्त्यांच्या हातात या प्रश्नांविषयी संकलित माहिती असावी यासाठी या पुस्तकाचे लेखन करण्यात आले आहे. या पुस्तकात जमिनीविषयक विविध कायद्यांच्या अंमलबजावणी, वारसानोंद, प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या कार्यपद्धती, पीक पाहणी, अनुसूचित जाती आणि जमातीच्या जमीनधारणा व समस्या, कुळवहिवाट, जमिनी जप्ती, अतिक्रमणे, कमाल जमीनधारणा कायदा, भूसंपादन व पुनर्वसन, शासनाने वाटप केलेली जमीन, ग्रामीण महाराष्ट्रात मानवी वस्त्यांचे प्रश्न, महाराष्ट्र शासनाचा जमीनमोजणी कार्यक्रम इत्यादी प्रश्नांची नोंद घेतली आहे.


पृष्ठसंख्या : १२४ । किंमत : ६० रु.

## ३६. प्राचार्य डॉ. नागोराव कुंभार गौरवग्रंथ विचारवंत आणि समाज

संपादक : प्रा. अशोक चौसाळकर

आधुनिक महाराष्ट्र घडविण्यात अनेक विचारवंतांनी-प्रबोधकांनी महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडली. विचारवंतांनी समाजप्रबोधनाचे, समाजपरिवर्तनाचे व समाजाला योग्य दिशा देण्याचे कार्य केले. पण आज खऱ्या विचारवंतांऐवजी स्वयंघोषित विचारवंतांची संख्या मोठी आहे. १९९० नंतरच्या बदलत्या सामाजिक-आर्थिक व राजकीय परिस्थितीत विचारवंत (अभ्यासक) व समाज यांच्यामध्ये अंतर पडले आहे. अशा परिस्थितीत महाराष्ट्राच्या सार्वजनिक जीवनात विचारवंत व अभ्यासकांचा हस्तक्षेप वाढावा ह्या हेतूने प्रस्तुत विचारवंत आणि समाज या डॉ. नागोराव कुंभार गौरवग्रंथाची रचना करण्यात आली आहे.

पृष्ठसंख्या : ३६० । किंमत : ३५० रु.






## ३७. मुलांनी फुलायचे तर

लेखक : डॉ. आलेथा सॉल्टर :
रूपांतर : विनया मालती हरी

लहान मुलाला जगाविषयी प्रचंड कुतूहल असतं आणि असंख्य प्रश्नही पडतात. आपल्याही मुलांबद्दल कुतूहल आणि अनेक प्रश्न असतात. मुलाशी संवाद कसा करावा? मूल वाढवताना आपल्याला कोणते ताण येतात? ते आपण कसे हाताळावेत? त्याच्याशी बरोबरीने वागावे की अधिकारवाणीने? 'बक्षीस' आणि 'शिक्षा' ही पद्धत योग्य आहे का? भीती दाखवली तर मूल घाबरट होईल, नाही दाखवली तर ते बेबंद होईल का? बालकापर्यंत येऊन ठेपलेली हिंसा व लैंगिक अत्याचार याविषयी कसा संवाद साधावा? प्रसारमाध्यमांच्या गराड्यात सापडलेले बालमन स्वतंत्र विचार कसा करेल? अशा प्रश्नांचा आणि बालमनाचा सर्वांगाने वेध घेणारे हे पुस्तक!


पृष्ठसंख्या : २४६ । किंमत : २०० रु.


## ३८. अर्थपूर्ण शिक्षणाच्या दिशेने

संपादन : विनया मालती हरी

आज प्रत्येकालाच 'अर्थपूर्ण' शिक्षण हवे आहे. अशावेळी अर्थपूर्ण शिक्षण म्हणजे काय, गुणवत्ता कशाला म्हणायचे, शिक्षणाचा आशय, असे अनेक प्रश्न उभे राहतात. गुणवत्तेच्या नावाने मुलांवर 'ओझे' तर लादले जात नाही ना? मुला-मुलींना मुक्तपणे कृती करायला, व्यक्त व्हायला वाव मिळतो का? त्यांचे कुतूहल, त्यांना पडणारे प्रश्न यांची काळजी तिथे घेतली जाते का? मूल दिवसाचे आठ-आठ तास घालवते ती वर्गखोली व शाळा कशी आहे? जीवनाला जोडून, रसपूर्ण व मैत्रीपूर्ण संवाद मुला-मुलींशी केला जातो का? मुलांना संवेदनशीलतेने शिकवले जाते का? शिक्षकाला स्वतःला शिकवताना आनंद मिळतो का? अशा अनेक अंगाने या पुस्तकात मांडणी केली आहे.

पृष्ठसंख्या : २६४ । किंमत : २५० रु.






## ३९. बहुभाषिकता : गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा पाया

संपादन : डॉ. अविनाश पांडे । विनया मालती हरी

मूल किती भाषा शिकू शकते? आपल्या मुलाला इंग्रजी माध्यमात घालावे की मराठी? 'मातृभाषे'त जरी मुलांना शिक्षण दिले, तरी तीच भाषा शिक्षणात समस्या का बनते? दुसरी भाषा (सेंकड लँग्वेज) शिकवण्याची पद्धत काय असावी? विकलांग वा वंचित घटकातील मुले शिक्षणात मागे पडू नयेत म्हणून त्यांना आवश्यक असे भाषाशिक्षण, शैक्षणिक साधने व शिक्षकांना तसे प्रशिक्षण मिळते? 'सर्वांना' गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळायचे, तर आपल्या बुहभाषिक देशातील भाषेचे धोरण काय असावे? अशा सर्व प्रश्नांवर आंतरराष्ट्रीय-राष्ट्रीय किर्तीचे भाषावैज्ञानिक आणि शिक्षणातील तज्ज्ञ आपल्याशी संवाद साधत आहेत या पुस्तकातून...

पृष्ठसंख्या : २३२ । किंमत : १६० रु.


## ४०. गाण्यांची शाळा

संकलन : विनया मालती हरी

विज्ञान-गणित-खगोल अशा विविध विषयातील संकल्पना गाण्यांतून सांगितल्या आहेत. त्यामुळे मुले ही गाणी ऐकून खूष होतातच, पण शिक्षकांचेही भान हरपून जाते. बऱ्याच गाण्यांना हावभाव करून म्हणता येते, त्यामुळे अवघड संकल्पनात्मक भाषा अगदी सहज मुलांच्या मनात रूजते. लहानपणी मुलांना शरीराच्या हालचाली करून आकलन जास्त होत असते. ती त्यांची गरजही यातून भागवली जाते, त्यामुळे त्या संकल्पनांबद्दल बोलायला लागल्यावर त्याचं ओझं मुलांना वाटत नाही. त्याचप्रमाणे या गाण्यांच्या आधारे जीवनाला जोडून संकल्पना स्पष्ट करण्याची प्रक्रिया घडवता येते. सहजशिक्षणातील हा आनंद शिक्षक आणि पालकांनादेखील होईल असा विश्वास जागवणारे हे पुस्तक.

पृष्ठसंख्या : ८० । किंमत : ५० रु.






## ४१. महाराष्ट्रातील पाण्याचा प्रश्न : एक शोधयात्रा

लेखक : रमेश पाध्ये । अमित नारकर

महाराष्ट्रातील शेतीक्षेत्रात अभिनव पद्धतीने विकासाचे काम करणाऱ्या निवडक उपक्रमशील गावांचा अभ्यास करण्याचा प्रकल्प 'द युनिक फाउंडेशन'ने शेतीअभ्यासक रमेश पाध्ये व संशोधक अमित नारकर यांच्या नेतृत्वाखाली हाती घेऊन पूर्ण केला. प्रत्यक्ष गावांना भेटी देऊन व लोकांशी संवाद साधून ही पाण्याची शोधयात्रा त्यांनी शब्दबद्ध केली आहे. राज्यातील पीकरचनेत सुयोग्य बदल तसेच लोकसहभागावर आधारित विकासकामे हे व यासारखे इथे सुचविलेले उपाय म्हणजे पाणीप्रश्नावर उत्तर शोधण्याची सुरुवात असून यातून असे अनेक प्रयोग सुरू करण्यास बळ मिळावे, हीच अपेक्षा.

पृष्ठसंख्या : १९६ । किंमत : १५० रु.


## ४२. सामाजिक समतेचा प्रवाह


प्रा. फकरुद्दीन बेन्नूर स्मृतिग्रंथ

संपादक : डॉ. सूर्यनारायण रणसुभे

महाराष्ट्रात मागच्या पाच-सहा दशकांत विभिन्न पातळ्यांवर सामाजिक प्रबोधनाच्या चळवळी उभ्या राहिल्या. या विभिन्न अशा प्रबोधनात्मक चळवळींना प्रा. फकरुद्दीन बेन्नूर यांनी सातत्याने हातभार लावला. आपल्या लेखन आणि कार्यातून त्यांनी एका बाजूला मुस्लीम समाजातील सर्वधर्मसमभावाच्या आणि समतेच्या परंपरा अधोरेखित केल्या. आणि दुसऱ्या बाजूला मुस्लीम समुदायाची प्रदेश-भाषा याआधारे स्थानिक ओळख प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला. अशा बहुआयामी व्यक्तिमत्व साकारलेल्या प्रा. फकरुद्दीन बेन्नूर यांच्या विचारप्रसाराला काही एक भातभार लावावा या प्रयोजनातून त्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ 'सामाजिक समतेचा प्रवाह' असा ग्रंथ प्रकाशित करण्यात आला.

पृष्ठसंख्या : ३३२ । किंमत : ३०० रु.






## ४३. मुक्तिमार्गाच्या प्रवासिनी

लेखक : तारा भवाळकर

संताचे साहित्य संकुचित अर्थाने केवळ धार्मिक म्हणून पाहिले जाते, पण ते अधिक व्यापक अर्थ जीवनविषयक चिंतन आहे. ते केवळ प्रस्थापित संस्कृति आणि व्यवस्था यांचे समर्थन करत नाही, तर त्याचा निषेध करते, त्या विरोधी आत्मिक बळही देते आणि विद्रोहाची भूमिका घेते हेही आता मान्य होत चालले आहे. या पार्श्वभूमीवर स्त्री संतांच्या रचनांचे विश्लेषण करणे हे प्रा. डॉ. तारा भवाळकरांनी या पुस्तकाद्वारे केली आहे. एकीकडे अगदी काश्मीरपासून ते दक्षिणेकडील केरळ-तमीळनाडू पर्यंत आणि पूर्वेकडील बंगालपासून पश्चिमेच्या गुजराज-राजस्थान पर्यंतच्या सर्व स्त्री-संतांच्या वचनांचा पट त्यांनी यामध्ये खुला केला आहे.


पृष्ठसंख्या : १३६ । किंमत : ८० रु.


## ४४. कृतीतून खगोलशास्त्र

अनुवाद : अश्विनी घोटाळे

चंद्र-सूर्य-तारे आणि विश्वाच्या जडणघडणीचे आकर्षण नाही अशी व्यक्ती सापडणे कठीण, मग तो लहान असो वा मोठा. आपले विश्व, त्यातले आपले स्थान काय याबद्दल याचा शोध आपण कैक शतके घेत आहोत. रोज आकाशात ताऱ्यांचे विभ्रम आणि प्रकाश व रंगांची उधळण बघताना त्यांनी जसे साहित्यिक-कवींना आकर्षित केले तसेच वैज्ञानिक-संशोधक-अभ्यासकांनाही भुरळ घातली. अशा या अत्यंत जिव्हाळ्याच्या परंतु गुंतागुंतीच्या विषयाच्या अभ्यासाकडे बालमन आकृष्ट करायचे काम डॉ. टी. वी. व्यंकटेश्वरन आणि अंशुमाला गुप्ता यांनी या पुस्तकाद्वारे केले आहे. पृथ्वी, तिचा आस, तिची गती, चंद्र-सूर्य व पृथ्वीचे स्थान व कक्षा आणि ही सगळी त्रिमितीय रचना अतिशय समजेल अशा ‘रोल प्ले’ अर्थात नाटकाच्या माध्यमातून केले आहे.

पृष्ठसंख्या : ६४ । किंमत : ५५ रु.






## ४५. मराठा वर्चस्वाचे आकृतीबंध आणि महाराष्ट्राचे सत्ताकारण

लेखक : विवेक घोटाळे

विवेक घोटाळे यांनी तपशीलवार अभ्यास करण्यावर भर देऊन आणि अभिनिवेश टाळून हे लेखन केले आहे. तसेच कोणतीही एक बाजू चूक किंवा बरोबर असे सांगणापेक्षा 'वर्चस्वशाली' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या जातीच्या राजकारणात वर्चस्व टिकवण्याची कसरत, वर्चस्वापुढची आव्हाने आणि राज्याच्या राजकारणातील बदलते प्रवाह यांचा एकत्रित विचार केला आहे. जात आणि राजकारण यांचा परस्पर संबंध, मराठा समाज व अभिजनांचे पेच, शेती अर्थव्यवस्थेसमोरील आव्हाने, मराठा राजकारण आणि मराठा वर्चस्व यामागील आर्थिक मुद्दा इत्यादींचा अभ्यास प्रस्तुत पुस्तकात संमिश्र अभ्यास पद्धतीद्वारे करण्यात आला आहे.


पृष्ठसंख्या : ३४६ । किंमत : ४५० रु. (हार्ड बाऊंड)


## 46. Revisiting Subalter Studies

Editor : Dr. Pradeep Waghmare

प्रस्तुत ग्रंथात आधुनिक भारतातील शोषित-अंकित जनसमूहांच्या चळवळी, त्यातील विविध समाज समूह व त्यांच्या जाणिवांचा आढावा घेण्यात आला आहे. हा ग्रंथ संपादक डॉ. प्रदिप वाघमारे यांनी तयार केला आहे. सबाल्टर्न इतिहासलेखन, दलित चळवळ, स्त्रीवादी चळवळी, आदिवासी चळवळ, शेतकरी व कामगार वर्गाच्या चळवळीवर नवीन दृष्टीकोन टाकणारे वीस संशोधन लेख प्रकाशित करण्यात आले आहेत. अनेक संशोधक व अभ्यासकांच्या या लिखाणातून आजवर राहिलेले उपेक्षित समूहांचे प्रश्न, समस्या, संघर्ष, प्रतिकार व आव्हाने अभ्यासता येतील. शोषित-अंकित जनसमूहांच्या चळवळीवर काम करणाऱ्या अनेक शिक्षक, संशोधक व अभ्यासक तसेच भारतावर विशेष लक्ष केंद्रित करून सामाजिक चळवळींवर काम करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी विशेषतः ग्रंथ उपयुक्त ठरेल.

पृष्ठसंख्या : ३३६ । किंमत : ४५० रु.






## ४७. ग्रामीण आणि कृषिप्रधान भारत : स्थिती अहवाल २०२०

लेखक : रिचा कुमार । निखित कुमार अग्रवाल । पी.एस. विजयशंकर । ए.आर. वसावी

प्रस्तुत NRAS अहवालात ग्रामीण भागातील विशेषतः कृषी अर्थव्यवस्थेसमोरील विविध समस्या, त्यांचा शेतकऱ्यांवर आणि शेतीवर अवलंबून असलेल्या वंचित घटकांवर होणाऱ्या परिणामांची चर्चा करण्यात आली आहे. शासनाच्या लोकानुनयवादी धोरणाचे धोकेदेखील स्पष्ट केले आहेत. केवळ समस्या सांगून हा अहवाल थांबत नाही तर विकेंद्रीकृत ग्रामीण विकास धोरणाची आवश्यकता, कृषी संशोधनाचे विकेंद्रीकरण, ग्रामीण अर्थव्यवस्था मजबूत करण्यासाठीचे आणि उत्पादन वाढीसाठीचे पर्याय, यासाठी राज्यसंस्थेची भूमिका काय असावी याचीही चर्चा या अहवालात करण्यात आली आहे. त्यासाठी आवश्यक आकडेवारी आणि महत्त्वपूर्ण संदर्भांचा आधार घेण्यात आला.


पृष्ठसंख्या : ८० । किंमत : १०० रु.

## ४८. उच्च शिक्षण धोरण आव्हाने आणि दिशा

लेखक : डॉ. डी. एन. मोरे

राष्ट्राचे शैक्षणिक धोरण हे एका अर्थाने आत्मपरीक्षणाचा आरसा, सुधारणांचा अजेंडा आणि जागतिक शैक्षणिक पर्यावरणाकडे लक्ष वेधणारी खिडकी असते. कोणत्याही धोरणाला अधिक आणि उणे या दोन बाजू असतात. त्यांची शिक्षणाच्या लाभधारकांमध्ये साधकबाधक चर्चा करून शिक्षणव्यवस्थेला अधिक सक्षम करणाऱ्या तरतुदींचे स्वागत करणे तर सार्वजनिक शिक्षणव्यवस्थेला बाधा पोहोचविणाऱ्या आणि सर्वांना समान, सक्तीचे, मोफत आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणापासून वंचित ठेवणाऱ्या बाबी शासनाच्या व प्रशासनाच्या निदर्शनास आणणे महत्त्वाचे असते. त्यामधून त्यात दुरुस्त्या व सुधारणा होऊन एक समग्र आणि परिपूर्ण धोरण तयार होत असते. त्यासाठी या धोरणाची चिकित्सा करून दिशादर्शक उपाय सूचविण्याचा प्रयत्न केला आहे.

पृष्ठसंख्या : १२८ । किंमत : १५० रु.






# द युनिक फाउंडेशन प्रकाशनाची पुस्तके मिळण्याची अन्य ठिकाणे

**युनिक बुक शॉप**
द युनिक ॲकॅडमी, फग्युर्सन कॉलेज मेन गेटसमोर,
शिरोळे रोड, शिवाजीनगर, पुणे - ०४.
**संपर्क : ७७७५०८३३४४ । ८६०५९९३३४४**

**पुस्तकवाला भाई**
२०४, शान ब्रम्हा कॉम्प्लेक्स, दुसरा मजला,
रतन टॉकीजच्या शेजारी, फरासखाना पोलिस चौकीच्या समोर,
अप्पा बळवंत चौक, पुणे - ४११००२.
**संपर्क : ९८२२५५१९११**

**साधना ग्रंथ प्रदर्शन आणि मीडिया सेंटर**
४३१ शनिवार पेठ, पुणे -३०.
**संपर्क : ७०५८२८६७५३**

**अक्षरवाङ्मय प्रकाशन**
सारस पार्क, प्लॅट नं.१०२, सर्व्हे नं. ०८, हिस्सा नं. ०५,
अभिनव कॉलेजजवळ, शिवाजीराजे पार्क, नऱ्हे, पुणे - ४११०४१.
**संपर्क : ९८३४०३२०१५**

**न्यू गणेश डेपो**
९- बी, छबिलदास रोड, दादर (पश्चिम), मुंबई - ४०००२८.
**संपर्क : ८३६९२९६५९६ । ७७३८९१५७९०**

**हरिती बुक गॅलरी**
गाळा नं. १०१, दुसरा मजला, आदर्श कॉलनी कॉम्प्लेक्स,
औसा रोड, लातूर.
**संपर्क : ७३८५५२१३३६**

**चोखंदळ बुक स्टोअर**
सुरक्षा कॉलनी, पंचशील चौक, संत गाडगेबाबा अमरावती
विद्यापीठजवळ, तपोवन, अमरावती - ४४४६०२.
**संपर्क : ८९९९९४५०५७**

**प्रतिभा बुक्स**
काळा मारुती चौक, नगरपालिकेचे शॉपिंग कॉम्प्लेक्स,
उरुण इस्लामपूर, ता. वाळवा जि. सांगली - ४१५४०९.
**संपर्क : ७५८८५८६६७६**

**करुणा बुक सेंटर**
रुबर फॅक्टरीजवळ, मु. कुरणी पो. माळणे (बु.)
ता. कागल जि. कोल्हापूर - ४१६२१९.
**संपर्क : ९६७३३५१४७८**

# द युनिक फाउंडेशन प्रकाशनाची
# सर्व पुस्तके मिळण्याचे ठिकाण



द युनिक फाउंडेशनची सर्व वैचारिक,
सामाजिक प्रश्नावरील पुस्तके आणि संशोधन
प्रकल्प अहवाल मिळण्याचे ठिकाण

## युनिक बुक शॉप

२० ते ३० टक्के सवलतीत नेहमीच उपलब्ध

(ग्रंथालयांसाठी पुस्तके खरेदी करण्यासाठीचे विश्वासार्ह ठिकाण)

द युनिक फाउंडेशनची
सर्व पुस्तके
amazon
वर उपलब्ध आहेत.

द युनिक फाउंडेशनची
सर्व पुस्तके मिळविण्यासाठी
QR कोड स्कॅन करा.

**संपर्क**

**युनिक बुक्स शॉप**

द युनिक ॲकॅडमी, फर्ग्युसन कॉलेज मेन गेट समोर,
शिरोळे रोड, शिवाजीनगर, पुणे-०४

**७७७५०८३३४४ | ८६०५९९३३४४**

**वेळ : सकाळी १० ते सायं. ६:३० (सातही दिवस)**